# नियमित दिवाणी दावा क्र. २०/२०२६ मधील अर्ज निशाणी क्रमांक ४१ खालील आदेश

**(CNR- MHWS050001042026)**

१) सदरचा अर्ज हा वादीने तहसिलदार मानोरा यांच्या दिनांक १३/५/२०२५ रोजीच्या आदेशाची अंमलबजावणी या दाव्यातील तात्पुरता मनाईचा अर्ज निशाणी ५ बाबत युक्तीवाद होत नाही तोपर्यंत करु नये म्हणून 'जैसे–थे' चा आदेश मिळावा यासाठी दाखल केला आहे.

२) प्रस्तुतचा अर्ज वाचला. प्रतिवादी क्र.३,४,६,८,१२ ते १४ यांनी दाखल केलेले लेखी म्हणणे निशाणी क्र. ४२ आणि वादी व प्रतिवादी यांनी दाखल केलेली कागदपत्रे पाहिली व विचारात घेतली. वादीतर्फे विधीज्ञ श्री.आर.के.रामटेके यांचा आणि प्रतिवादी क्र. ३,४,६,८,१२ ते १४ तर्फे विधीज्ञ श्री. एस.जी. बाखडे यांचा युक्तीवाद ऐकला.

३) वादीच्या विधीज्ञांनी असा युक्तिवाद केला की, वेणुबाई भिकाजी घाटे व इतर यांनी मामलतदार कोर्ट अधिनियम १९०६ मधील कलम ५ अन्वये दाखल केलेल्या अर्जावर मामलतदार तथा तहसिलदार यांनी दिनांक १३/५/२०२५ रोजी दावा मिळकत गट क्र. २६/४अ च्या अनुषंगाने आदेश पारीत केला आहे. तहसिलदार यांनी दिनांक ४/६/२०२५ रोजी पोलीस स्टेशन मंगरुळपीर यांना रस्त्याच्या आदेशाची अमलबजावणी करण्याकरीता पोलीस बंदोबस्त मिळण्यासाठी अर्ज दिला परंतू पोलीस बंदोबस्ताची रक्कम भरल्याची पावती प्रतिवादींनी दाखल केलेली नाही. तसेच दिनांक १६/६/२०२५ रोजीच्या पंचनाम्याच्या अनुषंगाने वादीस नोटीसही मिळालेली नाही. प्रतिवादी हे त्या दिनांक १३/५/२०२५ रोजीच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी तहसिलदार मानोरा यांच्याकडे अर्ज करतील आणि संबंधीत तहसिलदार हे उपविभागीय अधिकारी कारंजा यांच्या दिनांक १९/१/२०२६ रोजीच्या आदेशानुसार कार्यवाही करतील. त्यामुळे या दाव्यातील तात्पुरत्या मनाईच्या अर्जाच्या युक्तीवादापर्यंत दिनांक १३/५/२०२५ रोजीच्या आदेशाची अंमलबजावणी करु नये म्हणून 'जैसे थे'चा आदेश पारीत करण्यात यावा.

४)  याउलट प्रतिवादी क्र. ३,४,६,८, १२ ते १४ यांच्या विधिज्ञांनी असा युक्तिवाद केला की, तहसिलदार मानोरा यांनी सर्व चौकशीनंतर दिनांक १३/५/२०२५ रोजी आदेश पारीत केला आणि त्या आदेशाच्या विरुध्द वादीने उपविभागीय अधिकारी यांच्याकडे दाखल केलेली रिव्हीजन दिनांक १९/१/२०२६ रोजीच्या आदेशानुसार नामंजूर झालेली आहे व त्या रिव्हीजनमध्ये दिनांक १३/५/२०२५ रोजीच्या आदेशाच्या विरुध्द स्थगिती आदेश पारीत झालेला नाही. तहसिलदार यांच्या दिनांक १३/५/२०२५ रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने प्रतिवादी यांनी दिनांक ४/६/२०२५ रोजी विनंती अर्ज दिला व त्याचवेळेस तहसिलदार मानोरा यांनी दिनांक ४/६/२०२५ रोजी पोलीस स्टेशन मंगरुळपीर यांना रस्त्याच्या आदेशाच्या अंमलबजावणीसाठी पोलीस बंदोबस्त मिळावा म्हणून पत्र दिले आणि दिनांक १६/६/२०२५ रोजीच्या पंचनाम्यानुसार संबंधीत तलाठी व मंडळअधिकारी यांनी वहिवाटीचा रस्ता पोलीस बंदोबस्तात खुला केला व तेव्हापासून आजतागायत प्रतिवादी हे त्या रस्त्याचा वापर करीत आहेत. त्यामुळे वादीचा प्रस्तुतचा 'जैसे थे' चा आदेश मिळण्याचा अर्ज चालण्यास पात्र नाही म्हणून तो नामंजूर करण्यात यावा.

५)  वादीने कागदपत्राची यादी निशाणी क्र. ४ सोबत दिनांक १३/५/२०२५ रोजीच्या मामलतदार तथा तहसिलदार मानोरा यांच्या दिनांक १३/५/२०२५ रोजीच्या आदेशाची छायांकीत प्रत दाखल केलेली आहे व तो आदेश मामलतदार कोर्ट अधिनियम १९०६ मधील कलम ५ नुसार पारीत झाला आहे. त्यानंतर दिनेश किशनराव जरे प्रतिवादी क्र.७ यांनी तहसिलदार मानोरा यांच्याकडे दिनांक ४/६/२०२५ रोजी रस्ता खुला करुन देण्यासाठी अर्ज दिला. त्याच दिवशी तहसिलदार मानोरा यांनी पोलीस निरिक्षक मंगरुळपीर यांना पोलीस बंदोबस्त पुरविण्यासाठी पत्र दिले आणि दिनांक १६/६/२०२५ रोजीच्या पंचनाम्यानुसार तो वहिवाटीचा रस्ता पोलीस बंदोबस्तात व पंचासमक्ष खुला करुन दिला. त्यानंतर ग्राम महसुल अधिकारी मौजे रेणुकापुर यांनी तसा अहवाल दिनांक १६/६/२०२५ रोजी तहसिलदार मानोरा यांना पाठविलेला आहे. प्रतिवादी यांनी त्या अहवालाची, पंचनाम्याची, विनंती अर्जाची आणि पोलीस बंदोबस्त मिळण्यासाठी दिलेल्या अर्जाची छायांकीत प्रत कागदपत्राची यादी निशाणी क्र. ४४ नुसार दाखल केल्या आहेत. त्यानंतर तहसिलदार यांच्या आदेशाच्या विरुध्द वादीने उपविभागीय

अधिकारी कारंजा यांच्याकडे दाखल केलेली रिव्हीजन दिनांक १९/१/२०२६ रोजीच्या आदेशानुसार नामंजूर झालेली आहे.

६)  दिनांक १३/५/२०२५ रोजीच्या तहसिलदार मानोरा यांच्या आदेशानुसारचा रस्ता दिनांक १६/६/२०२५ रोजीच्या पंचनाम्यानुसार पंचासमक्ष व पोलीस बंदोबस्तात खुला केलेला असताना परत तो रस्ता खुला करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. त्यामुळे या परिस्थितीत प्रतिवादी हे तहसिलदार मानोरा यांच्याकडे दिनांक १३/५/२०२५ व दिनांक १९/१/२०२६ रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने रस्ता खुला करण्यासाठी अर्ज करतील, या वादीच्या विधीज्ञांच्या युक्तीवादात तिळमात्रही तथ्य दिसून येत नाही. त्यामुळे वादीने तहसिलदार मानोरा यांच्या दिनांक १३/५/२०२५ रोजीच्या आदेशाची अंमलबजावणी या दाव्यातील तात्पुरता मनाईचा अर्ज निशाणी ५ बाबत युक्तीवाद होत नाही तोपर्यंत 'जैसे–थे' चा आदेश मिळावा म्हणून दाखल केलेला अर्ज चालण्यास पात्र नाही आणि त्या अनुषंगाने 'जैसे थे' चा आदेश मिळण्यास वादी पात्र नाही. त्यामुळे उपरोक्त सर्व परिस्थिती, कागदपत्राची यादी निशाणी क्र. ४४ सोबत दाखल केलेल्या छायांकीत प्रती आणि दोन्ही विधीज्ञांचा युक्तीवाद विचारात घेवून मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## **आदेश**

वादीचा प्रस्तुतचा 'जैसे थे' चा आदेश मिळण्याचा अर्ज नि.४१ हा चालण्यास पात्र नसल्यामुळे नामंजूर करणेत येत आहे.

Digitally signed by HAMBIRE DHANANJAY BHAGWANRAO
Date: 2026.03.27 13:50:22 +0530

स्थळ : मंगरुळपीर
दिनांक : २७/३/२०२६.

( ध. भ. हंबीरे )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
मंगरुळपीर

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | C.R.Gadge |
| Name of Court | : | Shri. D. B. Hambire,<br>C.J.S.D.,Mangrulpir |
| Date of Decision | : | 27.3.2026 |
| Order signed by the P.O. on | : | 27.3.2026 |
| Order uploaded on | : | 27.3.2026 |